पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११०१८, **लेखा विभाग**
क्र.लेखा/९८ /कावि/ ८२४/ २०२०
दिनांक २३/ ०७ /२०२०

**विषय :- कोरोना विषाणू Covid-19 प्रादुर्भाव रोखण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आलेल्या वाहनांच्या इंधन देयकांबाबत.......**

**परिपत्रक,**

कोरोना विषाणू Covid-19 प्रादुर्भाव रोखण्याकरिता साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत करावयाच्या उपाययोजना कार्यवाहीमध्ये विविध विभागाकडील वाहने / रूग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. सदर रूग्णवाहिका व वाहनांकरिता पुरविण्यात आलेल्या वाहन इंधानाची देयके लेखा शाखेकडे अदायगीकामी प्राप्त होत आहेत.

तथापि, सदरच्या देयकांमध्ये संगणकीय पावत्या छायांकित प्रत इंधन पावतीवर वाहनचालकांची स्वाक्षरी व लॉकबुकची नोंद नसणे व इतर त्रुटी आढळुन आलेल्या आहे. त्यामुळे देयकावर आक्षेप घेणे भाग पडते. त्याचप्रमाणे सदरची देयके अदायगीकामी लेखा शाखेकडे वेळेवर प्राप्त होत नाही. त्यामुळे देयके अदायगीस विलंब होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

सबब, सर्व विभागप्रमुखांना सुचित करणेत येत आहे की, यापुढे कोरोना विषाणू संबंधित देयके, वाहन इंधनाची देयके विहित बाबींची पुर्तता करून वेळेवर लेखा शाखेकडे पाठविण्यात यावीत. सदर देयकांच्या अनुषंगाने विभागास काही माहितीची आवश्यकता असल्यास लेखाधिकारी, लेखा विभाग यांच्याशी संपर्क साधावा. सदरची तातडीची देयकांची योग्य ती पुर्तता वेळेत झाली नाही तर देयके अदायगी कामी विलंब झाल्यास त्यास लेखा विभाग जबाबदार रहाणार नाही. याची सर्व जबाबदारी ही त्या विभागप्रमुखाची राहील यांची सर्व विभागप्रमुखांनी नोंद घ्यावी.

(जितेंद्र कोळंबे)
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११०१८

प्रति,
सर्व संबंधित विभागप्रमुख / शाखाधिकारी